जनसंपर्क कक्ष
16 APR 2025 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांच्या विषयीच्या ग्रंथांचे प्रकाशन करताना खा. शाहू महाराज, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. यशवंत थोरात, विक्रमसिंह पाटणकर, बाळ पाटणकर, लेखक-प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण व प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे. (छाया : नाज ट्रेनर)

# छत्रपती राजाराम दुसरे आधुनिक युगाचा शुक्रतारा

## डॉ. पवार; विद्यापीठातर्फे महाराजांचा युरोप अभ्यास दौरा डायरीसह इतिहास ग्रंथांचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी कोल्हापूरच्या सर्वांगीण प्रगतीच्या लोककल्याणकारी विचार-उद्देशाने युरोप अभ्यास दौऱ्यावर गेलेले छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) हे आधुनिक युगाचे अग्रदूत आणि प्रबोधनाचा शुक्रतारा होते. त्यांना आणखी काही वर्षांचे आयुष्य लाभले असते, तर कोल्हापूरच्या इतिहासात मोठे बदल दिसले असते, अशा शब्दांत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी छत्रपती राजाराम महाराजांचा गौरव केला.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या शतकोत्तर अमृतमहोत्सवी जयंती (१५० वर्षे) निमित्त शिवाजी विद्यापीठ आणि बी. एन. पाटणकर ट्रस्टतर्फे डॉ. रघुनाथ कडाकणे अनुवादित 'यात्रा युरोपची : रोजनिशी (१८७०)' आणि प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण लिखित 'छत्रपती राजाराम महाराज (करवीर दुसरे)' या दोन ग्रंथांचा लोकार्पण सोहळा मेन राजाराम हायस्कूल येथे मंगळवारी झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि खासदार शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

डॉ. यशवंतराव थोरात यांनी जगाच्या इतिहासातील घडामोडींचे संदर्भ देत कोल्हापूरला १९ व्या शतकाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने छत्रपती राजाराम महाराजांनी युरोप अभ्यास दौरा केला होता, असे स्पष्ट केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, स्टडी टूर ही संकल्पना त्यांच्या डायरीतून स्पष्ट होईल, असे सांगितले. आजच्या राजकारण्यांनी काय शिकले पाहिजे, याची शिकवण या जीवनचरित्रातून मिळेल, असे विक्रमसिंह पाटणकर यांनी सांगितले. लेखक-प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण, प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे यांचीही भाषणे झाली

बाळ पाटणकर यांनी छत्रपती राजाराम महाराज दुसरे यांचे स्मारक कोल्हापुरात व्हावे, असे आवाहन केले. यावेळी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. बी. पी. साबळे, डॉ. रमेश जाधव, आनंद माने, व्यंकाप्पा भोसले, सुरेश शिपूरकर, सुनीलकुमार लवटे, ऋतुराज इंगळे, नकुल पाटणकर, सिद्धार्थ पाटणकर उपस्थित होते. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले.

16 APR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांना जातीच्या चौकटीत बसवल्याने अधोगती

## डॉ. राधेश्याम जाधव यांचे प्रतिपादन; डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज अशा महामानवांना जातीच्या चौकटीत बसवणे चुकीचे आहे. त्यामुळेच आज समाजाची अधोगती सुरू आहे. शोषणमुक्तीसाठी प्रत्येकाने आपल्यातील स्व जागृत केला, तर न्याय म्हणजेच स्वातंत्र्य, समता, बंधूता प्राप्त होते, असे प्रतिपादन द हिंदू वृत्तपत्र समूहाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट कोल्हापूरच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय' या विषयावर डॉ. जाधव यांचे व्याख्यान शाहू स्मारक भवन येथे आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

डॉ. जाधव म्हणाले, बुद्धिजीवी वर्ग स्वतःच्या समाजासाठी काम करण्याऐवजी अप्पलपोटी झाला आहे. तो स्वतःचेच पाहतो, आपल्यातील शोषितांची नाळ तोडतो, त्यामुळे अप्रगतांची प्रगती होत नाही. महामानवांनी समतेची पताका आपल्या खांद्यावर दिली आहे, ती खाली पडू नये, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, भारत देश जातीवर आधारित आहे. युरोपात जात नाही, तेथे वर्गव्यवस्था आहे. आता तर भारतात दोन्ही आहेत. पूर्वी आंतरजातीय विवाह केल्यास त्याला वाळीत टाकले जात होते, आता समजून घेतले जाते. यातून थोडी प्रगतीकडे वाटचाल दिसते.

यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ, वृत्तपत्र विभागाचे डॉ. शिवाजी जाधव यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2025
लोकमत

# महावीर अध्यासन इमारतीचे शुक्रवारी भूमिपूजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १८) करण्यात येणार आहे. ही इमारत जैन धर्मियांसह अहिंसाप्रेमी देणगीदारांच्या आर्थिक सहकार्यातून साकार होत आहे. विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारतीच्या शेजारील जागेत ती बांधण्यात येईल, अशी माहिती अध्यासन समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2025

सकाळ

# महावीर अध्यासन इमारतीचे शुक्रवारी भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. १८) सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. या अध्यासनाची इमारत जैन धर्मीयांसह अहिंसाप्रेमी देणगीदारांच्या आर्थिक सहकार्यातून साकार होत आहे. विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरातील जागेत ही इमारत बांधण्यात येणार आहे. या कार्यक्रमास देणगीदारांसह शुभेच्छुक व्यक्ती, संस्था आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासन समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2025
पुढारी

# महावीर अध्यासन इमारतीचे शुक्रवारी भूमिपूजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीचे भूमीपूजन सार्वजनिक आरोग्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १८) सकाळी साडेदहा वाजता करण्यात येणार आहे. ही इमारत जैनधर्मियांसह अहिंसाप्रेमी देणगीदारांच्या आर्थिक सहकार्यातून साकारत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात कै. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारतीच्या शेजारील जागेत ही इमारत बांधण्यात येणार आहे. कार्यक्रमास देणगीदारांसह शुभेच्छुक व्यक्ती, संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासन समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2025
तरुण भारत



# महावीर अध्यासन इमारतीचे शुक्रवारी भूमीपूजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीचे भूमीपूजन महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते येत्या शुक्रवार दि. १८ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात येणार आहे. इमारत जैनधर्मियांसह अहिंसाप्रेमी देणगीदारांच्या आर्थिक सहकार्यातून साकार होत आहे. या कार्यक्रमास देणगीदारांसह शुभेच्छुक व्यक्ती, संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासन समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

16 APR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



क्रांतिकारी शोध

# लोकशाहीला बळ देणारे छपाई यंत्र!

डॉ. व्ही.एन. शिंदे

मानवी संस्कृतीमध्ये समाजाला सुसंस्कृत ठेवण्यासाठी आज सर्वात महत्त्वाची भूमिका वठवणारे साधन म्हणजे पुस्तक. मानवी संस्कृतीसोबत मुद्रण तंत्रही विकसित झाले. भाषा निर्माण झाल्या. संवाद सुरू झाला. जाणवलेले मानवाला लिहावे वाटू लागले. त्यासाठी लिपी तयार झाली. त्यानुसार अक्षरांच्या माध्यमातून लिहायला सुरुवात झाली. निसर्गात उपलब्ध असलेले रंग शाई म्हणून वापरले जाऊ लागले. पुढे कपड्यावर लिहिले जाऊ लागले. त्यासाठी रेशमी कापडाचा सर्वाधिक वापर केला जात असे. यादरम्यान भोजपत्रांचा वापर सुरू झाला. अनेक ऋषींनी आपल्या रचना भोजपत्रावर लिहिल्या. त्याची दुसरी प्रत तयार करायची असेल तर पुन्हा सर्व मजकूर आहे तसा लिहावा लागत असे. हे मोठे जिकिरीचे काम असे. लिहिताना कोणतीही चूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागत असे.

अनेक राजे, बादशहा आणि सत्ताधीश महत्त्वपूर्ण ग्रंथांचे, धार्मिक ग्रंथांची प्रत खास लिहून घेत. याचे सुंदर वर्णन नोबेल पुरस्कार विजेते लेखक ओऱ्हान पामुक यांच्या 'माय नेम इज रेड' या कादंबरीमध्ये वाचावयास मिळते. हे मोठे खर्चिक आणि वेळखाऊ काम असल्याने सर्वसामान्यांच्या कुवतीबाहेरचे होते, त्यामुळे ज्ञान संपादन करणेही सर्वसामान्यांच्या आवाक्यात नव्हते. हे सर्व बदलण्यास कारण ठरले ते छपाई यंत्र. या यंत्राने जग बदलले.

चीनमध्ये सर्वात अगोदर छपाईला सुरुवात झाली ती लाकडी ठोकळ्याच्या सहाय्याने दुसऱ्या शतकाच्या अखेरीस. पुढे अकराव्या शतकात अक्षरांचे आकार तयार केले जाऊ लागले तेही चीनमध्येच. एका प्रतलात बाह्य भाग असणारे ठोकळे तयार केले जात आणि ते शिक्क्याप्रमाणे उठवत. मात्र, मोठे ठोकळे कागदावर उमटवताना सर्व अक्षरांची शाई सारखी उमटत नसे, कारण ठोकळ्याच्या सर्व भागांवर सारखाच दाब पडत नसे. त्यासाठी प्रयत्न सुरू केले ते जर्मन संशोधक गोल्डस्मिथ जोहान्स गटेनबर्ग यांनी. त्यांनी ग्रीसमध्ये दारू बनवण्यासाठी दाब देणाऱ्या यंत्राच्या रचनेचा वापर करून आपले छपाई यंत्र बनवण्यासाठी आराखडा तयार केला. त्याहीअगोदर अरब राष्ट्रामध्ये कुराणाच्या ओळी छापण्यासाठी असे दाबाचे यंत्र वापरण्यात येत असे.

जर्मनीमधील गटेनबर्ग यांनी १४४० च्या दरम्यान एका जागेवरून दुसऱ्या जागेवर नेता येईल असे पहिले छपाई यंत्र तयार केले. आता ठोकळ्याच्या सहाय्याने कागदावर अक्षरे किंवा मजकूर उमटवताना सर्व अक्षरे सारखी उमटत होती. या यंत्राच्या सहाय्याने एका दिवसात ३६०० पानांची छपाई करता येत असे. अर्थात, शाई लावलेला भाग कागदावर उमटवण्यासाठी मानवी शक्तीचा वापर करण्यात येत असे. आता शंभर पानांच्या हजार प्रती छापण्यासाठी ठोकळे तयार झाल्यानंतर १५ दिवसापेक्षाही कमी वेळ लागू लागला. खर्चात आणि वेळेची बचत यामुळे आपोआपच निर्मिती खर्च कमी झाला, यामुळे पुस्तकांची छपाई करणे युरोपमध्ये सुरू झाले. कमी मजकुराची कागदपत्रे मोठ्या प्रमाणात छापण्यात येऊ लागली. जागोजागी छापखाने सुरू झाले. युरोपियन देशातील २०० शहरांमध्ये १५०० पेक्षा जास्त छापखाने अवघ्या साठ वर्षांत सुरू झाले. एका वर्षात दोन कोटी प्रतींची निर्मिती करण्यात आली. पुढे एका वर्षातील छपाईचा वेग दहा पटीने वाढला. गटेनबर्ग यांनी या यंत्रावर सर्वप्रथम बायबल छापले. १५१५ मध्ये अक्षरे कोरण्याचे तंत्र विकसित झाले. अमेरिकेमध्ये पहिला छापखाना सतराव्या शतकात सुरू झाला. बायबलची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी युरोपमधून छपाई यंत्रे मागवली. सुरुवातीस छापखान्यांचा उपयोग प्रामुख्याने बायबल आणि अन्य धर्मग्रंथ छापण्यासाठी करण्यात येत असे. मात्र, लवकरच या यंत्रांचा वापर आपले स्वतंत्र विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी होऊ लागला. लोक धर्मग्रंथामधील आपल्या मनाला न पटणाऱ्या बाबींसंदर्भात आपली मते छापू लागले. त्याचबरोबर राजाचे निर्णय न आवडणारे बंडखोर विचाराचे लोक आपले मुक्त विचार छापून घेऊ लागले. हा छापील मजकूर लोकांपर्यंत सहज पोहोचवता येणे शक्य होते. लोकांना अक्षरांची ओळख करून घेणे, शिक्षण घेणे सहज आणि सोपे झाले. यातून राजसत्ता आणि धर्मसत्ता दोन्ही अस्वस्थ झाले. साक्षरतेमध्ये मोठी वाढ झाली, त्यामुळे लिहिता-वाचता येणाऱ्या प्रतिष्ठित लोकांची मक्तेदारी मोडली गेली. लोकांना जुलमी राजवट नकोशी वाटू लागली आणि लोकशाहीची मुळे रूजू लागली.

लेख एकण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा.

दरम्यान, न्युकोमन या संशोधकाने वाफेवर चालणारे यंत्र तयार केले. या वाफेच्या शक्तीचा वापर अठराव्या शतकाच्या अखेरीस गटेनबर्ग यांचे यंत्र चालवण्यासाठी सुरू झाला, त्यामुळे छपाई प्रतींचा वेग शंभर पटीने वाढला. कुटिरोद्योगाचे रूप असणाऱ्या छापखान्यांना उद्योगाचे रूप मिळाले. साक्षरतेमध्ये झालेल्या अचानक वाढीतून पुस्तकांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. छपाई यंत्रांची कार्यक्षमता वाढवणे गरजेचे झाले. त्यातून आणखी वेगवान छपाई यंत्राची गरज पडू लागली. ती गरज वाफेच्या शक्तीची खरी ओळख करून देणाऱ्या जेम्स वॅट यांच्या शोधानंतर भागली.

त्याचबरोबर शिसे किंवा लाकडी ठोकळ्यावर अक्षरे कोरण्यापेक्षा शिशाची अक्षरे उलटी तयार करून ती सुलटी छापण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आणि नंतर ती जुळवून मजकूर छापण्याचे तंत्र विकसित झाले. या अक्षरांना खिळे म्हणत. असे अक्षरांचे खिळे जुळवून पहिली प्रत काढून मुद्रितशोधन करण्यात येत असे. त्यानंतर प्रत्यक्ष छपाई करत असत. पुढे संगणक आले आणि छपाईचे संपूर्ण विश्व बदलले गेले. संगणकांवर मजकूर थेट टंकलिखित केला जाऊ लागला. त्याची थेट प्लेटवर प्रिंट घेऊन ऑफसेट तंत्राच्या सहाय्याने छपाई सुरू झाली.

छपाई वेगवान होण्यास वाफेच्या यंत्राला विद्युत ऊर्जेवर चालणाऱ्या यंत्रानी मोठी मदत केली. त्यानंतर इतक्या वेगाने छपाई सुरू झाली की लाखो प्रती एका दिवसात छापणारी यंत्रे बाजारात आली. हजारो, लाखो पुस्तकांच्या प्रती एका महिन्यात तयार होऊ लागल्या. याचा सर्वाधिक फायदा वर्तमानपत्र उद्योगाला मोठा झाला. वर्तमानपत्रांची छपाई उशिरा करून ताज्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचवता येणे शक्य झाले. आज मागणीनुसार पुस्तकांच्या छपाईसाठी उपयुक्त असणाऱ्या यंत्रांची निर्मिती आणि वापर सुरू झाला आहे. स्क्रीन प्रिंटिंग, इंकजेट प्रिंटिंग, लेसर आणि डिजिटल प्रिंटिंग ही तंत्रे विकसित झाली.

छपाई यंत्रामुळे पुस्तकांची, विचारांची मोठ्या प्रमाणात छपाई करणे आणि लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाल्याने लोकांचे मतपरिवर्तन करण्यामध्ये छपाई यंत्रांनी मोठी भूमिका निभावली. आज समाजमाध्यमांचा वापर जसा लोकांचे मत परिवर्तन करण्यासाठी होत आहे, अगदी तसाच उपयोग छपाई यंत्रांचा झाला. मात्र, पुढे लोकांना खऱ्या खोट्यांची ओळख होऊ लागली. लोक प्रगल्भ झाले. समाजमाध्यमांबाबत ही जाणीव व्हायला अजून वेळ आहे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००